महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.२३/पदभरती/का-४ दि.२०-०९-२०२३

## परिपत्रक क्र.१५

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (Govt. ITI) विविध व्यवसायातील शिल्प निदेशक (Craft Instructor) (गट-क) संवर्गातील पदभरती करिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दि.१७/०८/२०२२ रोजी संचालनालयाच्या www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने श्री.बाळू नामदेव भोसले व इतर १२ यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे Original Application No.७६१/२०२२ अन्वये दाखल केलेल्या याचिके संदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०३/०२/२०२३ रोजी दिलेल्या न्याय निर्णयाच्या अनुषंगाने दि.१७/०८/२०२२ रोजीच्या जाहिरातीमधील परिच्छेद क्र.१५.२१ व १५.२२ मधील तरतूदी संचालनालयाच्या दि.२१/०२/२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये सुधारीत करण्यात आल्या होत्या.

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या दि.०३/०२/२०२३ रोजीच्या न्याय निर्णयाच्या अनुषंगाने **श्री.राजेश ज्ञानेश्वर राठोड व श्री.विनोद यशवंत शेळके यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.२६५४/२०२३ दाखल केली होती. या संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२४/०८/२०२३ रोजी दिलेल्या न्याय निर्णयाच्या अनुषंगाने संचालनालयाचे दि.२१/०२/२०२३ रोजीचे परिपत्रक रद्द करण्यात येत असून जाहिरातीमध्ये परिच्छेद क्र.१५.२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार उमेदवारांची गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल व १५.२२ मध्ये नमूद तरतुदीनुसार ज्या पात्र उमेदवारांचे एकूण गुण समान असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येईल.**

* (सदर परिपत्रक हे विविध याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या याचिकांवरील सक्षम न्यायालयाच्या न्याय निर्णयाच्या अधिन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे.)

तरी उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
( दि. अं. दळवी )
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.